# MAHARASHTRA POLICE MEGA CITY CO-OP HOUSING SOCIETY LTD.
Lohegaon , Pune

MPMC
MAHARASHTRA POLICE MEGA CITY

Registration No. PNA/PNA/(4)/HSG/(TO)/1342/2010
Office : Ganga Complex, Flat No. 1, 1st Floor, Above Bafna Hardware, Airport Road, Yerwada, Pune-411 006 (Mah) India
Tel/Fax : (020) 26689014/15 Email : mpmcpune@gmail.com
Website : www.mpmcpune.com


To,
.....................................................
.....................................................
.....................................................
Ph.......................................

No.MPMC/AGM-4/48/2015
Date – 24/07/2015
Reg.ID.

## वार्षीक सर्वसाधारण सभेचे सूचनापत्र

(फक्त सभासदांसाठी)

महाराष्ट्र पोलीस मेगासिटी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित लोहगांव, पुणे या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची वार्षीक सर्वसाधारण सभा रविवार दि.०९/०८/२०१५ रोजी दुपारी ठीक ०४.०० वाजता श्री.छत्रपती शिवाजी क्रिडा संकुल म्हाळूंगे (बालेवाडी) बॅटमिंटन हॉल पुणे येथे खालील विषयांवर निर्णय घेण्याकरीता आयोजीत केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय**

१) सभेच्या अध्यक्षांची निवड करणे.

२) मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

३) सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक हिशोबी पत्रकांना मान्यता देणे.

४) सन २०१४-२०१५ या वर्षाच्या वैधानिक लेखा परिक्षण अहवालास व दोषदुरुस्ती अहवालास मान्यता देणे.

५) सन २०१५-२०१६ करीता वैधानिक लेखा परिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

६) संचालक मंडळाने दि.२९/०८/२०१४ रोजीच्या मागील सर्वसाधारण सभेनंतर आजपर्यंतच्या त्यांच्या कार्यकाळात घेतलेल्या निर्णयास मान्यता देणे.

७) सन २०१५-२०१६ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

८) ९७ व्या घटना दुरुस्ती नुसार संस्थेसाठी आदर्श उपविधी स्विकारणे व त्यातील पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे. (आदर्श उपविधी संस्थेच्या कार्यालयात पहावयास उपलब्ध आहे पोटनियम दुरुस्तीची शब्दरचना यासोबत जोडली आहे.)

९) संस्थेच्या पुढील कामकाजाबाबतची माहिती सभासदांना देणे.

१०) सध्या भाग भांडवल मर्यादा रु.२० लाखापर्यंत आहे. सदरची मर्यादा ही रु. ५० लाखापर्यंत वाढविणे व मान्यता देणे.

११) ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार अध्यक्षांच्या परवानगीने करणे.

स्थळ-पुणे
दि. २४/०७/२०१५

(महंमदरफी खान)
सचिव
महाराष्ट्र पोलीस मेगासिटी सहकारी
गृहरचना संस्था मर्यादित लोहगाव, पुणे

---

सूचना- १. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा सभेच्या वेळेच्या अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल. त्यास गणपूर्तीची आवश्यकता भासणार नाही.

२. सोबत वरील विषयांकित अ.क्र. ३ व ४ नुसार हिशोबी पत्रके जोडले आहे. या शिवाय अधिक काही माहिती पाहीजे असल्यास कृपया संस्था कार्यालयात संपर्क साधावा.

## वार्षीक सर्वसाधारण सभा रविवार दि.०९/०८/२०१५ सभेपुढील विषय क्र.८ नुसार ९७ व्या घटना दुरुस्ती नुसार संस्थेसाठी आदर्श उपविधी स्विकारणे व त्यातील पोटनियम दुरुस्ती मान्यता देणे या ठरावाची शब्दरचना

| पोटनियम क्रमांक | जुनी शब्दरचना | दुरुस्तीनंतरची शब्दरचना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| **IV**<br>उद्दिष्टे<br>**5** (आय) | नाही | संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये इमारती बांधणे, आवश्यकतेनुसार सदर इमारतींच्या विविध गृहरचना संस्था स्थापण करणे.<br>नविन होणाऱ्या संस्था ह्या संस्था अंतर्गत संस्था स्थापण करणे व सदर संस्थेला या संस्थेचे सभासदत्व देणे. | सभासदांच्या मागणीनुसार |

## MAHARASHTRA POLICE MEGA CITY CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD.,(REGD.)
### Regn.No.PNA/PNA(4)/HSG(TO)/1342/2010-11
### BALANCE SHEET AS AT 31st MARCH 2015

| PREVIOUS YEAR | FUNDS AND LIABILITIES | | CURRENT AMOUNT |
|---|---|---|---|
| | **AUTHORISED SHARE CAPITAL** | | |
| 2000000 | 40000 Shares of Rs.50/- each | | 2000000 |
| | **ISSUED AND PAID UP SHARE CAPITAL** | | |
| 1833000 | 36660 shares of Rs.50/-each issued & fully paid up | | 1833000 |
| 1700000 | Share Application Money | | |
| 1700000 | Less:Transfer to Share Capital | | 0 |
| | **RESERVE FUND::** | | |
| 366600 | Entrance Fees | | 366600 |
| | **INCOME AND EXPENDITURE ACCOUNT:** | | |
| 92151 | **Balance b/d.** | 92809 | |
| 658 | Add:Surplus for the year | 614 | 93423 |
| 92809 | | | |
| | **CURRENT LIABILITIES AND PROVISIONS:** | | |
| 628939041 | Advance from Members towards Flat | | 628846312 |
| 0 | Advance from Members towards Flat-Phase-ii | | 272951070 |
| 22003160 | Advance from Members towards Exps. | | 21211160 |
| 0 | Advance from Members for Shares/E.Fees | | 496200 |
| 0 | Advance from Members towards Exps.-Phase-ii | | 7408800 |
| 0 | TDS on Contract for 2014-15 | | 4242 |
| 2280 | Professional Charges payable | | 11280 |
| 0 | TDS on Professional Fees for 2014-15 | | 1000 |
| 0 | Rent payable to Mr.Sunil B Varpe | | 50000 |
| 278790 | Audit Fees Payable | | 247455 |
| 32958 | Education Fund payable | | 43956 |
| 2490 | Electricity Charges Payable-MSEDCL | | 5510 |
| 2431 | Telephone Charges Payable-BSNL | | 2357 |
| 14829 | TDS on Audit for 2013-14 | | 0 |
| 0 | TDS on Audit for 2014-15 | | 27495 |
| 0 | TDS on Rent for 2014-15 | | 44000 |
| 240000 | Meeting Expenses Payable | | 697360 |
| 653808388 | **TOTAL** | | 934341220 |

| PREVIOUS AMOUNT | PROPERTIES AND ASSETS | | CURRENT AMOUNT |
|---|---|---|---|
| 538141 | **FIXED ASSETS(Net Block) (As per Schedule)** | | 891072 |
| | **CURRENT ASSETS, LOANS AND ADVANCES:** | | |
| | **Advance Paid to Builders-** | | |
| 629513400 | M/s.B.E.Bilimoria & Co | | 629938407 |
| 17500000 | Fixed Deposit with SBI | | 277828460 |
| | **F.D. with P.D.C.C.Bank Ltd** | | |
| 1830000 | towards Shares | | 1830000 |
| 200000 | Rent Deposit | | 200000 |
| 645018 | T.D.S.-Balance b/d. | 645018 | |
| 0 | Add:TDS for the year | 290558 | 935576 |
| 656894 | Accrued interest on F.D. | | 1449734 |
| 0 | Amount recoverable from Media Research | | 1202 |
| 3000 | Prepaid TDS | | 0 |
| 0 | Prepaid Insurance | | 1052 |
| 1413 | Cash on hand | | 91000 |
| | **Balances with** | | |
| 1989957 | S.B.I.Savings A/c.-Phase-I | 704479 | |
| 0 | S.B.I.Savings A/c.-Phase-II | 19311765 | |
| 453790 | P.D.C.C.Bank Ltd (Ent. Fees) | 498460 | |
| 476775 | P.D.C.C.Bank Ltd | 660013 | 21174717 |
| 653808388 | **TOTAL** | | 934341220 |

for MAHARASHTRA POLICE MEGA CITY CO-OP.HSG.SOC.LTD.(REGD.)

D. B. Wangaskar
Certified Auditor
Latur

D.B. WANGASKAR LATUR Certified Auditor

CHAIRMAN — SECRETARY — TREASURER

CHAIRMAN
MAHARASHTRA POLICE MEGA CITY
CHS. LTD. PUNE

SECRETARY
MAHARASHTRA POLICE MEGA CITY
CHS. LTD PUNE

TREASURER
MAHARASHTRA POLICE MEGA CITY
CHS. LTD. PUNE

## MAHARASHTRA POLICE MEGA CITY CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD.,(REGD.)
Regn.No.PNA/PNA(4)/HSG(TO)/1342/2010-11
### INCOME AND EXPENDITURE ACCOUNT FOR THE PERIOD ENDED 31ST MARCH 2015

| PREVIOUS YEAR AMOUNT | EXPENDITURE | CURRENT YEAR AMOUNT | PREVIOUS YEAR AMOUNT | INCOME | CURRENT YEAR AMOUNT |
|---|---|---|---|---|---|
| 29509 | TO POSTAGE & COURIER CHARGES | 20849 | | BY CONTRIBUTION | |
| 1793187 | TO PROFESSIONAL FEES | 1788436 | 1299000 | FROM MEMBERS | 832000 |
| 47915 | TO PRINTING AND STATIONERY | 53092 | | | |
| 17289 | TO REPAIRS AND MAINTENANCE | 37694 | | BY INTEREST ON | |
| 148288 | TO AUDIT FEES | 277665 | 123997 | SAVINGS A/C.WITH BANKS | 121042 |
| 420000 | TO RENT,RATES AND TAXES | 470000 | | | |
| 42985 | TO OFFICE EXPENSES | 141962 | | BY INTEREST ON | |
| 2084 | TO BANK CHARGES | 937 | 1930584 | FIXED DEPOSIT WITH BANKS | 3067008 |
| 10998 | TO CONTRIBUTION TO EDUCATION FUND | 10998 | | | |
| 39520 | TO ELECTRICITY CHARGES | 38250 | | BY EXCESS PROVISION OF | |
| 0 | TO ADVERTISEMENT | 160549 | 0 | MEETING EXPS.W/BACK | 54425 |
| 1759 | TO INTEREST ON TDS & LATE PAYMENT | 90 | | | |
| 0 | TO INSURANCE CHARGES | 319 | 0 | BY OTHER INCOME (FORMS) | 79680 |
| 0 | TO NEWS PAPERS & PERIODICALS | 3427 | | | |
| 0 | TO COMPUTER MAINTENANCE | 8200 | | | |
| 116464 | TO TRAVELLING & CONVEYANCE | 119490 | | | |
| 442110 | TO AGM EXPENSES | 747830 | | | |
| 29661 | TO TELEPHONE CHARGES | 43435 | | | |
| 3890 | TO WEB SITE DESIGNING CHARGES | 0 | | | |
| 20968 | TO XEROX M/C.MAINT.&COPYING CHRGS | 9742 | | | |
| 186296 | TO DEPRECIATION | 220576 | | | |
| | TO EXCESS OF INCOME OVER | | | | |
| 658 | EXPENDITURE- SURPLUS | 614 | | | |
| 3353581 | TOTAL | 4154155 | 3353581 | TOTAL | 4154155 |

for MAHARASHTRA POLICE MEGA CITY CO-OP.HSG.SOC.LTD.(REGD.)

D. B. WANGASKAR LATUR Certified Auditor

D. B. Wangaskar
Certified Auditor
Latur

CHAIRMAN SECRETARY TREASURER

CHAIRMAN
MAHARASHTRA POLICE MEGA CITY
CHS. LTD. PUNE

SECRETARY
MAHARASHTRA POLICE MEGA CITY
CHS. LTD PUNE

TREASURER
MAHARASHTRA POLICE MEGA CITY
CHS. LTD. PUNE

MAHARASHTRA POLICE MEGA CITY
CO-OP HOUSING SOCIETY LTD.
Lohegaon, Pune

MPMC
MAHARASHTRA POLICE MEGA CITY

Registration No. PNA/PNA/(4)/HSG/(TO)/1342/2010
Office : Ganga Complex, Flat No. 1, 1st Floor, Above Bafna Hardware, Airport Road, Yerwada, Pune-411 006 (Mah) India
Tel/Fax : (020) 26689014/15 Email : mpmcpune@gmail.com
Website : www.mpmcpune.com

To,
..................................................
..................................................
..................................................
..................................................
Ph. ..............................

No. MPMC/Flat No. Allotment/49/2015
Date – 24/07/2015
Reg.ID. ............

विषय- महाराष्ट्र पोलीस मेगासिटी-लोहगांव, पुणे या संस्थेच्या मागील सर्वसाधारण सभेपासुन ते दि.०९/०८/२०१५ रोजीच्या सर्वसाधारण सभेदरम्यान या संस्थेचा प्रगती अहवाल...

महोदय,

महाराष्ट्र पोलीस मेगासिटी सहकारी गृहरचना संस्था लोहगांव पुणे या गृहप्रकल्प संस्थेच्या सर्व सभासदांचा फ्लॅट नंबर वाटप कार्यक्रम (पहिला व दुसरा टप्पा) व वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ०९ ऑगस्ट २०१५ रोजी दुपारी १४.३० वाजता आयोजित केली आहे. सर्वप्रथम फ्लॅट नंबर वाटप कार्यक्रम व त्यानंतर लगेचच वार्षिक सर्वसाधारण सभा सुरु करण्यात येईल.

सर्व सभासदांनी कार्यक्रमाचे अगोदर अर्धा तास सभागृहात स्थानापन्न व्हावे ही विनंती. फ्लॅट नंबर वाटपाचा कार्यक्रम व वार्षिक सर्वसाधारण सभा एकाच ठिकाणी म्हणजे शिवछत्रपती क्रिडा संकुल, म्हाळूंगे बालेवाडी, पुणे येथील बॅडमिंटन हॉलमध्ये होणार आहे.

आपणा सर्वांना ज्ञात असेलच की मागील वर्षाच्या सर्वसाधारण सभेत मा. संस्था अध्यक्ष व सचिव यांनी अतिशय आनंदाने निवेदन केले होते की, गृहप्रकल्पाचे जागेचे झोनबदलीचे (एन.ए) आदेश अनेक प्रयत्नांनी चार वर्षाच्या प्रदिर्घ कालावधीनंतर झालेले आहेत. सदरचे आदेश महाराष्ट्र राज्याचे राजपत्र क्रमांक क्र.टीपीएस-१८१२/७८७/प्रक्र.१३७/१२/पुनर्बांधणी क्र.६०/नवि-१३, दि.०६/०९/२०१४ (महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-१ पुणे विभागीय पुरवणी दि.०६/०९/२०१४) मध्ये प्रसिध्द झाले आहेत. झोन बदलीचे आदेश झाल्याबदद्ल आपण सर्व सभासद महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री व माजी गृहराज्य मंत्री यांचे अभिनंदन करीत आहोत.

वरील प्रमाणे झोन बदलाचे (शेती झोन ते रहिवाशी झोन) आदेश आपणास अधिकृतरित्या माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये प्राप्त झाले. या झोन बदली आदेशात नमुद केलेल्या शर्ती व अटींचा बारकाईने व जाणीवपूर्वक अभ्यास या विषयाचे माहितगार अधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन करण्यात आला. या आदेशात शासनाने आपणास १.२ F.S.I. दिल्याने याचा फायदा घेत आपण पूर्वी प्रस्तावीत असलेल्या ३६६६ सभासद व दुसऱ्या टप्प्यातील १५८२ सभासद एकुण ५२४८ सभासद यांचे करीता प्रत्येकी चौदा मजली इमारतीचे (एकूण ६० इमारती) बांधकाम सुरु करीत आहोत व त्याचे टप्याटप्याने वाटप करणार आहोत. जागेचा व इमारतींचा प्लॅन विकसक यांचे आर्किटेक्ट यांनी संस्थेस मंजूरीकरीता दिला होता. त्यात योग्य त्या सुधारणा/सुचना/फेरफार करुन स्थानिक शासकीय कार्यालयात मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आहेत.

नविन प्लॅन करताना संचालक मंडळाने विकसक व आर्किटेक्ट यांच्याशी अनेक वेळा चर्चा करुन त्यांच्याकडून संस्थेच्या हिताच्या व गरजेच्या वाढीव सोयीसुविधा मान्य करुन घेतल्या आहेत. दिनांक १९/०५/२०१० व दिनांक ०२/११/२०१० च्या M.O.U. मध्ये विकसक आपणास फक्त एकच संस्था कार्यालय बांधून देणार होते, परंतू संस्थेमधील प्रत्येक इमारतीची अतिशय उत्कृष्टपणे देखभाल होऊन प्रत्येक सभासदांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये म्हणून प्रत्येक इमारतीसाठी एक स्वतंत्र सोसायटी निर्माण करणे आवश्यक असल्याने आम्ही भविष्याचा विचार करुन प्रत्येक इमारतीमध्ये त्या त्या इमारतीच्या सोसायटीचे एक लहान कार्यालय बांधून देण्याचे विकसकाने मान्य केले आहे. तसेच एकुण ६० इमारतीच्या सोसायटीच्या प्रतिनिधींची महाराष्ट्र पोलीस मेगासिटी ही मुख्य संस्था राहणार आहे. अभ्यागत (व्हिजीटर्स) किंवा कर्मचारी व वाहनचालक यांचेकरीता ही प्रत्येक इमारतीमध्ये एक सार्वजनिक टॉयलेट बांधून देण्याचे कबूल केले आहे. या सर्व गोष्टी विकसक व संस्था यांचे मध्ये होणाऱ्या अंतिम करारात नमूद करण्यात आल्या आहेत.

झोनबदल आदेशात नमूद केल्याप्रमाणे आपल्या संस्थेस मिळालेल्या वाढीव १.२ F.S.I. नुसार सर्व इमारती चौदा मजल्याच्या होणार असल्याने त्या अनुषंगाने उपलब्ध होणाऱ्या १५८२ नविन सदनिकांचे दर ठरविणे व बुकिंग चालू करण्याच्या संदर्भात विकसक व संस्था संचालक यांच्यात ५-६ वेळा मुंबई - पुणे येथे दर (Rate) निश्चितीबाबत विस्तृत व अभ्यासपूर्वक बैठका होऊन सध्या चालू असलेल्या (रु. २८७२ प्र.चौ.फु.) दुसऱ्या टप्यातील दर निश्चित करण्यात आले व याच दराने सध्या दुसऱ्या टप्यातील बुकिंग चालू आहे. (सध्या लोहगाव येथील बांधकामाचा दर ४३६० ते ५३६० प्रती चौ.फुट असा आहे. संदर्भ - टाईम्स ऑफ इंडीया दि.१८/०७/२०१५ व शासनाच्या रेडीरेकनर प्रमाणे ५५१४ इतका प्रति चौ.फुट दर आहे.)

प्रकल्पासाठी खरेदी केलेल्या जमीनीचा झोन शासनाने रहीवासी झोन मध्ये बदलून दिलेला आहे. राजपत्रातील अटी व शर्तीनुसार संस्था व बांधकाम व्यावसायीक यांचा अंतीम नोंदणीकृत करार होताच शासनाने काढलेल्या झोन बदलाचा आदेश अमलात येईल व या अंतीम करारासाठी सभासदांच्या नावाची यादी, त्यांना मिळालेल्या इमारतीचा व फ्लॅटचा नंबर इत्यादी गोष्टी अंतिम करारात नमुद करणे आवश्यक आहे. तसेच गृहकर्जासाठी आपला फ्लॅट बँकेकडे तारण ठेवण्यासाठी सुध्दा सदर बाबी आवश्यक असल्यामुळे या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तसेच संस्थेमध्ये नोंद झालेल्या एकुण सभासदांच्या नावाची यादी त्यांना बांधकामाच्या नियोजीत प्लॅननुसार कोणत्या बिल्डींगमध्ये कोणत्या नंबरचा फ्लॅट देण्यात येणार आहे या माहीतीसह जर एक परिशिष्ट बिल्डर बरोबर होणाऱ्या रजिस्टर्ड अॅग्रीमेंटला जोडले तर सभासदांना दोन वेळा स्टॅम्प ड्युटी भरावी लागणार नाही असे कायदेशीर सल्लागारांचे मत असल्याने सर्व सभासदांच्या फायद्याच्या दृष्टीने हा फ्लॅट नंबर वाटप कार्यक्रम अतिशय आवश्यक होता हे कृपया लक्षात घ्यावे.

संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांनी फ्लॅट नंबर वाटप कार्यक्रमास व वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहावे अशी संचालक मंडळाची विनंती आहे. कार्यक्रमास येताना सदरचे पत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

सर्वसाधारण सभे बाबतचे विशेष पत्र सोबत जोडले आहे.

सर्व संचालक व पदाधिकारी महाराष्ट्र पोलीस मेगासिटी
सहकारी गृहरचना संस्था मर्यादित लोहगाव पुणे.

धन्यवाद...

सचिव
महाराष्ट्र पोलीस मेगा सिटी सहकारी गृह
रचना संस्था मर्यादित लोहगांव - पुणे

अध्यक्ष
महाराष्ट्र पोलीस मेगा सिटी सहकारी गृह
रचना संस्था मर्यादित लोहगांव - पुणे